o/c

कार्यकारी अभियंता कार्यालय
स्वातंत्र्यवीर सावरकर भवन
बांधकाम विकास विभाग,
झोन क्र.3
पुणे महानगरपालिका
जा.क्र. : झोन क्र. 3/ ४७४९
दिनांक : 30/5/24

केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत मागणी अर्जानुसार सदरची देण्यात आलेली माहिती प्रत.
बांधकाम विकास विभाग झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका

सूचना

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २६७ (१) अन्वये, व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये)

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन स्था. १९५०
EST.1950

प्रति,

1) **विकसक, रोहन सरसन अविष्कार डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. संजय बाळकृष्ण बूब**
प्लॉट नं. १, शीट क्र. ४९ए, सेक्टर ६ए,
अमन टॉकीज रोड, उल्हासनगर- ४२१००२.

2) **ला.आर्कि. श्री. शिरिष दसनुरकर**
३५, लक्ष्मी पार्क कॉलनी, नवी पेठ, पुणे - ४११०३०.

पुणे, पेठ बाणेर येथील स.नं. ५४ पैकी व ५५ पैकी ही मिळकत लँडलॉक झाले असल्याचे व सदर मिळकतीस रस्ता उपलब्ध करून देणेबाबत अर्जदार श्री. मुकुंदा तापकीर यांनी बांधकाम विकास विभाग, झोन क्र.०३ कडे अर्ज केला आहे. पुणे, पेठ बाणेर स.नं. ५४/१, ५४/२, ५४/६ या मिळकतीवर संमतीपत्र / PLUI/0083/09/1398 दि. ०४/०५/२००९ अन्वये विकसक, मे. रोहन सरसन अविष्कार डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. संजय बाळकृष्ण बुब यांनी ला. आर्कि. समीर वाळिंबे यांचेमार्फत रोहन लेहेर- १ मंजूर केला होता. लँडलॉक मिळकतीलगत असलेल्या ॲमेनिटी स्पेसला रोहन लेहेर १ या लेआऊटमधून मुख्य रस्त्यापासून ९.० मी. रस्ता उपलब्ध नसल्याची तक्रार श्री. मुकुंदा तुकाराम तापकीर यांनी केली आहे.

पुणे, पेठ बाणेर येथील स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी) या मिळकतीवर संमतीपत्र क्र. सीसी/०३१६/२१ दि.२०/०५/२०२१ अन्वये विकसक, रिजेन्सी अविष्कार डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार श्री. संजय बाळकृष्ण बुब यांनी ला.आर्कि. शिरीष

दसनुरकर यांचेमार्फत "रिजेन्सी अविष्कार" हा लेआऊट मंजूर केला आहे. दोन्ही प्रकल्पाचे म्हणजे रोहन लेहेर - १ व रिजेन्सी अविष्कार यांचे विकसक म्हणून श्री. संजय बुब आहेत.

पुणे, पेठ बाणेर स.नं. ५४/१ पै. येथील ॲमेनिटी स्पेससाठी रोहन लेहेर - १ या लेआऊटमधून मुख्य रस्त्यापर्यंत ९.० मी. रस्ता उपलब्ध होणेबाबत निर्णय होत नाही, तोपर्यंत बाणेर स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी अविष्कार) या बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६७ (१) अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये 'काम थांबवा' नोटीस देणेस मा. शहर अभियंता यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

ज्याअर्थी सदरच्या अधिनियमातील तरतुदी अन्वये मा. महापालिका आयुक्त यांनी आम्हाला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 267 व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ संबंधीचे अधिकार दिले आहेत.

त्याअर्थी आपणास या नोटीशीने कळविण्यात येते की, ही नोटीस मिळाल्यावर ताबडतोब बाणेर स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी अविष्कार) येथील सुरु असलेले बांधकाम बंद करण्यात यावे. सदरचे बांधकाम तसेच तुमच्याकडून अगर तुमच्या देखरेखीखाली चालू ठेवण्यात आले तर वर नमूद करण्यात आलेल्या अधिनियमातील तरतूदीनुसार व आम्हांस प्राप्त असलेल्या अधिकारान्वये काम करणाऱ्या इसमास पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीने घालविले जाईल व त्याप्रित्यर्थ होणारा खर्च तुमच्याकडून वसूल केला जाईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे "कलम ४३३(क) अनुसार या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यक्तिरिक्त पदनिर्देशित अधिकाऱ्याने काढलेली नोटीस, काढलेला कोणताही आदेश किंवा दिलेला कोणताही निदेश, यांना कोणत्याही दाव्यामध्ये किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीमध्ये हरकत घेता येणार नाही" याची नोंद घ्यावी.

केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत मागणी अर्जानुसार सदरची देण्यात आलेली माहिती प्रत.
बांधकाम विकास विभाग, झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका

जागेवरील बांधकामाची आजची स्थिती :- आर.सी.सी. काम पूर्ण.

कळावे.

पदनिर्देशित अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता
बांधकाम विकास विभाग, झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका

पदनिर्देशित अधिकारी तथा
उप अभियंता
बांधकाम विकास विभाग, झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका

केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम
सन २००५ अंतर्गत मागणी अर्जानुसार सदरची देण्यात आलेली माहिती प्रत.

दिनांक :- २९/०९/२०२६

मा. शहर अभियंता
पुणे महानगरपालिका

बांधकाम विकास विभाग झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर .....

विषय - पुणे, पेठ बाणेर स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी अविष्कार) येथील बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६७ (१) अन्वये 'काम थांबवा' नोटीस देणेबाबत.

संदर्भ - १) श्री. मुकुंदा तापकीर यांचा इकडील कार्यालयाकडील विविध तक्रारी अर्ज.
२) रोहन लेहेर-१ बाणेर स.नं. ५४/१, ५४/२, ५४/६ या मिळकतीवरील लेआऊट परवानगी संमतीपत्र क्र. PLUI/0083/09/1398 दि. ०४/०५/२००९.
३) स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी अविष्कार) या मिळकतीवरील लेआऊट / बांधकाम परवानगी.
४) मा. महापालिका यांचे दालनात झालेली सुनावणी.

दिनांक १७/०९/२०२६ रोजी मा. महापालिका आयुक्त कार्यालय येथे बाणेर स.नं. ५४/१ पै. येथील ॲमेनिटी स्पेससाठी मुख्य रस्त्यापासून ९.० मी. रस्ता उपलब्ध करुन देणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे दालनात सुनावणी पार पडली. सदर सुनावणीस मा. महापालिका आयुक्त, शहर अभियंता, अधिक्षक अभियंता, झोन क्र. ३ चे कार्यकारी अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच अर्जदार श्री. प्रकाश तापकीर व श्री. संतोष तापकीर उपस्थित होते. विषयांकित मिळकतीचे (रिजेन्सी अविष्कार) विकसक, श्री. संजय बुब व ला.आर्किटेक्ट श्री. शिरीष दसनुरकर सदर सुनावणीस उपस्थित नव्हते.

संदर्भ क्र. १ अन्वये पुणे, पेठ बाणेर येथील स.नं. ५४ पैकी व ५५ पैकी ही मिळकत लँडलॉक झाले असल्याचे व सदर मिळकतीस रस्ता उपलब्ध करून देणेबाबत अर्जदार श्री. मुकुंदा तापकीर यांनी बांधकाम विकास विभाग, झोन क्र.०३ कडे अर्ज केला

आहे. सदर सुनावणीच्या वेळी अर्जदार / तक्रारदार यांनी लँडलॉक मिळकतीलगत असलेल्या ॲमेनिटी स्पेसला रोहन लेहेर १ या लेआऊटमधून मुख्य रस्त्यापासून ९.० मी. रस्ता उपलब्ध नसल्याची तक्रार श्री. मुकुंदा तुकाराम तापकीर यांनी केली आहे. तसेच तत्कालीन विकसक यांनी ॲमेनिटी स्पेस पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात देताना बाणेर स.नं. ५४ ऐवजी बाणेर स.नं. ५४ पैकी व ५५ पैकी मध्ये देऊन शासनाची फसवणूक केली आहे, असे त्यांनी तक्रारीमध्ये नमूद केले आहे. ताब्यात देण्यात अनियमितता व पुणे महानगरपालिकेची फसवणूक केलेली असून, शासनाचा महसूल बुडविला असून त्यांचे सध्या चालू असलेल्या प्रकल्पास म्हणजेच बाणेर स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी अविष्कार) येथील बांधकामास स्टॉप वर्क देण्यात यावी म्हणून अर्जदार श्री. संतोष तापकीर हे आग्रही आहेत.

पुणे, पेठ बाणेर स.नं. ५४/१, ५४/२, ५४/६ या मिळकतीवर संमतीपत्र / PLUI/0083/09/1398 दि. ०४/०५/२००९ अन्वये विकसक, मे. रोहन सरसन अविष्कार डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. संजय बाळकृष्ण बुब यांनी ला. आर्कि. समीर वाळिंबे यांचेमार्फत रोहन लेहेर- १ मंजूर केला होता. सदर ठिकाणी संपूर्ण भोगवटापत्र प्राप्त असून सोसायटी स्थापन झालेली आहे. सदर ले-आऊट मधील बाणेर स.नं. ५४/१ पै. ३२४२.९० चौ.मी. क्षेत्राची ॲमिनिटी स्पेस सन २०१० मध्ये पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली. सदर ॲमेनिटी स्पेससाठी रोहन लेहेर - १ लेआऊटमधून मुख्य रस्त्यापासून ९.० मी. रस्ता उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येत आहे. परंतु तत्कालीन काळात सदर ॲमेनिटी स्पेस ताब्यात घेण्यात आलेली आहे. जागेवरील ॲमेनिटी स्पेस ही डी.पी. व गाव नकाशा यांची तपासणी केली असता, ती बाणेर स.नं. ५४ मध्ये नसून बाणेर स.नं. ५४ पैकी व ५५ पैकी मध्ये आढळून येत असल्याचे निदर्शनास येत आहे, असे खात्याचे मत आहे.

केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम
सन २००५ अंतर्गत मागणी अर्जानुसार सदरची
देण्यात आलेली माहिती प्रत.
बांधकाम विकास विभाग झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका

पुणे, पेठ बाणेर येथील स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी) या मिळकतीवर संमतीपत्र क्र. सीसी/०३१६/२१ दि.२०/०५/२०२१ अन्वये विकसक, रिजेन्सी अविष्कार डेव्हलपर्स एलएलपी तर्फे भागीदार श्री. संजय बाळकृष्ण बुब यांनी ला.आर्कि. शिरीष दसनुरकर यांचेमार्फत "रिजेन्सी अविष्कार" हा लेआऊट मंजूर केला आहे. दोन्ही प्रकल्पाचे म्हणजे रोहन लेहेर - १ व रिजेन्सी अविष्कार यांचे विकसक म्हणून श्री. संजय बुब आहेत.

मा. महापालिका आयुक्त यांनी सदर लँडलॉक झालेल्या मिळकतीस रस्ता नसेल व प्रथमदर्शनी अर्जदार यांनी सांगितलेली वस्तुस्थिती असेल तर स्टॉपवर्क देण्याचे आदेश दिले आहेत.

तरी पुणे, पेठ बाणेर स.नं. ५४/१ पै. येथील ॲमेनिटी स्पेससाठी रोहन लेहेर -१ या लेआऊटमधून मुख्य रस्त्यापर्यंत ९.० मी. रस्ता उपलब्ध होणेबाबत निर्णय होत नाही, तोपर्यंत बाणेर स.नं. ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/प्लॉट, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ॲमेनिटी स्पेस, ५३/१ ते ४/८/५४/८ ते ११/ओपन स्पेस (रिजेन्सी अविष्कार) या बांधकामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६७ (१) अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये 'काम थांबवा' नोटीस देणेस मा. शहर अभियंता यांची मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा. स. कळावे.

(विमय येलपले)	(उमेश शिंदुक)	(मुकुंद बर्वे)	(प्रविण शेडे)
कनिष्ठ अभियंता	उप अभियंता	कार्यकारी अभियंता	प्र. अधिक्षक अभियंता
बां.वि.वि. झोन क्र.३	बां.वि.वि. झोन क्र.३	बां.वि.वि. झोन क्र.३	बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका	पुणे महानगरपालिका	पुणे महानगरपालिका	पुणे महानगरपालिका

सोबत :- रोहन लेहेर-१, रिजेन्सी अविष्कार या प्रकल्पाचे नकाशे व श्री. मुकुंदा तापकीर यांचे तक्रारी अर्ज.

E:\BANER\54-55_Tapkir_Work Stop Nivedan.doc

केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम सन २००५ अंतर्गत मागणी अर्जानुसार सदरची देण्यात आलेली माहिती प्रत.
बांधकाम विकास विभाग झोन क्र. ३
पुणे महानगरपालिका